तरुण भारत 10 August 2023

# कृत्रिम रिफसाठी आजपासून मच्छीमारांशी संवाद

## चेन्नईतील वैज्ञानिक करणार तांत्रिक मार्गदर्शन; मच्छीमारांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजन

मालवण

केंद्र शासनाच्या पंतप्रधान मत्स्य संपदा योजनेंतर्गत कृत्रिम रिफ आणि सागरी संचयनामार्फत शाश्वत मत्स्य व्यवसाय व उपजीविकेस प्रोत्साहन या नवीन घटकाचा समावेश करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कृत्रिम रिफ स्थापनेबाबतची तांत्रिक माहिती देण्यासाठी केंद्रीय समुद्री मत्स्यिकी अनुसंधान संस्थान, चेन्नई येथून वैज्ञानिक डॉ. जो. किझाकुडन हे सिंधुदुर्गच्या दौऱ्यावर येणार आहेत. १० ऑगस्ट रोजी देवगड आणि मालवण, तर ११ रोजी वेंगुर्ले येथे ते मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत मच्छीमारांशी संवाद साधणार आहेत.

देवगडमध्ये सकाळी १०.३० वाजता देवदुर्ग मत्स्य सहकारी संस्थेत तेथील मच्छीमारांशी संवाद साधला जाणार आहे. नंतर सायं. ४.३० वाजता मालवण दांडी आवार येथील मत्स्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात येथील मच्छीमारांना कृत्रिम रिफबाबत तांत्रिक माहिती दिली जाईल. ११ रोजी वेंगुर्ले मत्स्य सहकारी संस्थेत तेथील मच्छीमारांशी संवाद साधला जाणार आहे. कृत्रिम रिफबाबत मच्छीमारांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त जाणकार मच्छीमार, नौकामालक, खलाशी, तांडेल, संस्था सभासद आदींनी संबंधित ठिकाणी चर्चासत्रासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन सहाय्यक मत्स्य आयुक्त अलगिरी यांनी केले आहे.


कोरल रिफ

### जिल्ह्यात प्राथमिक ११ ठिकाणे सूचित केलीत

जिल्ह्याला लाभलेल्या सागरी जलधी क्षेत्रात आर्टिफिशियल रिफ अर्थात कृत्रिम खडक स्थापित करण्यासाठी मत्स्य विभागाकडून प्राथमिक स्वरूपात एकूण ११ अंदाजित स्थळे मत्स्य आयुक्त कार्यालयाला सूचित करण्यात आली आहेत. यात मालवण तालुक्यातील शिपला पॉईंट ते सुवर्णकडा सोमवती बीचसमोर, रॉकगार्डन ते राजकोटसमोर, सिंधुदुर्ग किल्ल्याच्या मागे, कोठारा ते ११ रॉक मालवण, देवगड तालुक्यातील कुणकेश्वर मंदिर ते मिठमुंबरी बीचसमोर, शिनबाबची काठी ते देवगड झिपलाईन, गिर्ये बीच ते रामेश्वर बीचसमोर, तर वेंगुर्ले तालुक्यातील खवणे बीचसमोर, निवती किल्ल्यासमोर, निवती दीपगृहासमोर, कोंडुरा बीचसमोर आदी ठिकाणांचा समावेश आहे.